आस्थापना विभाग कार्यालय
पुणे महानगरपालिका,
जावक क्र.आस्था/प्र४/९४५५
दि.२३/०३/२०२०

मा. उप आयुक्त (सा.प्र.),
तथा अध्यक्ष पुनर्विलोकन समिती
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सादर--

विषय : वयाच्या ५०/५५ वर्षापलीकडे/अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षाच्या कालावधीपुढे सेवेत राहण्याची पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांची पात्रापात्रता अजमाविण्याबाबत.

संदर्भ : १. महापालिका आयुक्त कार्यालय, जा.क्र.३२५६ दिनांक १८/०१/२०१८ चे कार्यालयीन आदेश. प-४
२. अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय, जा.क्र.अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/प्र४/ ३०६२ दिनांक २७/०६/२०१८ चे कार्यालयीन आदेश.
३. कर आकारणी व कर संकलन कार्यालय, जा.क्रं.टीजीओ३३३५ दि.०९/०९/२०१९. नि-१

संदर्भ क्र. १ चे आदेशांप्रमाणे अंमलबजावणीकामी वर्ग अ व ब च्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत वयाची ५० वर्षे पूर्ण होतेवेळी किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण होतेवेळी, यापैकी जे प्रथम घडेल त्यावेळी आणि वर्ग क ते ड च्या कर्मचाऱ्यांच्या वयाच्या ५५ व्या वर्षी किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण होतेवेळी, यापैकी जे प्रथम घडेल त्यावेळी, करावयाच्या पुनर्विलोकनासाठी शारीरिक क्षमता, निर्विवाद सचोटी व "चांगला" पेक्षा कमी नाही असा अभिलेख हा निकष विहित करण्यात आला आहे. या बाबी विचारात घेऊन पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/सेवकांची दि.३१ मार्च २०१८ अखेर पात्रापात्रता अजमावून त्यांची सेवा चालू ठेवणे अथवा समाप्त करणेची कार्यवाही करावयाची आहे.

त्यानुषंगाने संदर्भ क्र. १ चे कार्यालयीन आदेशानुसार संबंधित खात्यांचे उप आयुक्त/खातेप्रमुखांचे अध्यक्षतेखाली अभिवेदन समिती गठीत केलेली असून, समितीचे सदस्य, सदस्य सचिव समिती अध्यक्ष यांनी निर्देशित केलेले आहेत. नि-१

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील गठीत अभिवेदन समितीने कर आकारणी व कर संकलन विभागाचे अधिनस्त "वर्ग-ड" पदावरील सेवकांची विषयानुसार पात्र/अपात्रता ठरवून अहवाल सादर केलेला आहे.

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील वर्ग – ड पदावरील १. श्री. शिवलिंगप्पा शिवप्पा उमाघोळ २. श्री. प्रकाश विठ्ठल गोगावले ३. श्रीमती सत्यभामा कैलास धावारे ४. श्री. गजानन गुलाब घाडगे ५. श्रीमती ताराबाई बाळासाहेब म्हेत्रे ६. श्री. बाबासाहेब कृष्ण ओव्हाळ या सेवकांची शिफारस केलेली असून, सर्व सेवकांना अभिवेदन समितीने पात्र ठरविलेले आहे. नि-३

संदर्भ क्र. १ चे कार्यालयीन आदेशांनुसार वर्ग - ड मधील पदांसाठी "पुनर्विलोकन समिती" पुढील प्रमाणे आहे, मा. उप आयुक्त (सा.प्र.) - अध्यक्ष, मा. मुख्य लेखापरीक्षक - सदस्य, मा. मुख्य कामगार अधिकारी - सदस्य, प्रशासन अधिकारी (आस्थापना विभाग) – सदस्य सचिव.

तरी, मा. सह महापालिका आयुक्त, तथा अध्यक्ष अभिवेदन समिती कर आकारणी व कर संकलन कार्यालय यांचे संदर्भ क्र. ३ चे पत्रासोबतचा अहवाल वरील सूचनांसह स्वीकृत करून मंजूर केल्याबद्दल मा. उप आयुक्त (सा.प्र.) तथा अध्यक्ष पुनर्विलोकन समिती यांची स्वाक्षरी होणेस विनंती आहे.

(प्रकाश मोहिते)
प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग
तथा
सदस्य सचिव (पुनर्विलोकन समिती)
पुणे महानगरपालिका

मा.मुख्य लेखा परीक्षक तथा
सदस्य पुनर्विलोकन समिती,

शिफारस आहे.

सह महापालिका आयुक्त
(मुख्य लेखापरिक्षक)
पुणे महानगरपालिका

मा. मुख्य कामगार अधिकारी तथा
सदस्य पुनर्विलोकन समिती

यांचे मार्फत सादर--

शिफारस आहे.

16.4.2020
(शिवाजी दौंडकर)
मुख्य कामगार अधिकारी
पुणे महानगरपालिका

मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्र. 2803
दिनांक 26/03/2020

उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका
टपाल क्रमांक : आ/ ०५
दिनांक: 25/04/2020

उपआयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

कामगार कल्याण विभाग
पुणे महानगरपालिका
आवक क्र.: एल.ओ./ १६३८
19 MAR 2020
संकलन श्रीमती मोहिते
कामगार अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी

मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्र. ३५१९
दिनांक :- 23/03/2020

नि १

कर आकारणी व कर संकलन कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.टीजीओ/ 3334
दि. 04/09/2019

मा. उप आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग)
पुनर्विलोकन समिती
पुणे महानगरपलिका

यांजकडेस....

विषय: वयाच्या ५०/५५ वर्षांपलीकडे/ अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षाच्या कालावधीमध्ये सेवेत राहण्याची पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांची पात्रापात्रता आजमाविण्याबाबत.

संदर्भ: १. महापालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.३२५६, दि.१८/०१/२०१८ चे कार्यालयीन आदेश.
२. अति. महापालिका आयुक्त (ज.) कार्यालय जा.क्र. अतिमआ (ज.)/साप्रवि/आस्था/ प्र४/३०६२,दि२७/०६/२०१८ चे कार्यालयीन आदेश.
३. कर आकारणी व कर संकलन कार्यालय जा. करा. टीजिओ/२४२९ दि.२६/०७/२०१८ चे कार्यालयीन आदेश

संदर्भीय आदेशाप्रमाणे अंमलबजावणी करणेकामी वर्ग 'ड' च्या सेवकांच्या बाबतीत वयाची ५० वर्षे पूर्ण होतेवेळी किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण होतेवेळी, यापैकी जे प्रथम घडेल त्यावेळी करावयाच्या पुनर्विलोकनासाठी शारीरिक क्षमता, निर्विवाद सचोटी व "चांगला" पेक्षा कमी नाही असा अभिलेख हा निकष विहीत करण्यात आला आहे. या बाबी विचारात घेऊन पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/ सेवकांची पात्रापात्रता आजमावून त्यांची सेवा चालू ठेवणे अथवा समाप्त करणे कार्यवाही करावयाची आहे.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र.३ चे कार्यालयीन आदेशानुसार कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील अभिवेदन समिती गठित करण्यात आली असून अभिवेदन समिती सदस्य निर्देशित करण्यात आलेले आहेत.

अभिवेदन समिती	
कर आकारणी व कर संकलन कार्यालयामधील वर्ग 'ब', 'क' आणि 'ड' मधील अधिकारी/ कर्मचारी यांचे शिफारशीसाठी	
१. श्री. विलास कानडे (मा.सह महापालिका आयुक्त)	- अध्यक्ष
२. श्री. वैभव भानुदास कडलख (मा. महापालिका सहा. आयुक्त)	- सदस्य सचिव
३. शाम तारू (प्रशासन अधिकारी – वर्ग २)	- सदस्य

कर आकारणी व कर संकलन विभागाकडे असलेल्या सेवकांपैकी वर्ग ४ (ड)-६ आहेत. त्यांची माहिती सोबत विहीत नमुन्यात सादर केली आहे.

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील गठित केलेल्या अभिवेदन समितीने वस्तुस्थितीचे अवलोकन करून विषयाचे अनुषंगाने पात्र अपात्र बाबत शिफारस केलेली आहे.

तरी, सोबत सदर बाब आपले माहितीसाठी सादर.

मा.स.कळावे,

आस्थापना विभाग कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्रमांक:- आस्था/6065
दिनांक:-04/09/2019

सह महापालिका आयुक्त,
अध्यक्ष, अभिवेदन समिती,
कर आकारणी व कर संकलन प्रमुख
पुणे महानगरपालिका

नि ३

कर आकारणी व कर संकलन विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र . : -
दिनांक : -

मा. सह महापालिका आयुक्त तथा
अध्यक्ष अभिवेदन समिती
कर आकारणी व कर संकलन कार्यालय
पुणे महानगरपालिका

विषय:- वयाच्या ५०/५५ वर्षापलीकडे/आहर्ताकारी सेवेच्या ३०वर्षाच्या कालावधीमध्ये सेवेत राहण्याची पुणे महानगर पालिका कर्मचा-यांची पात्रापात्रता आजमाविन्याबाबत.

कर आकारणी व कर संकलन विभागाकडील वर्ग-४ च्या खालील सेवकांची विषयांकित कार्यवाहीबाबत सेवापुस्तकांची तपासणी केली असता, कोणत्याही आक्षेपार्ह नोंदी आढळून आल्या नाहीत.

कार्यालीन आदेश जा.क्र.३२५६ दि.१८/०१/२०१८ अन्वये प्राप्त निर्देशानुसार खालील तक्त्यामध्ये माहिती नमूद केली आहे.

अ.क्र.	सेवकांचे नाव /हुद्दा	जन्म दिनांक	शारीरिक क्षमतेबाबत अभिप्राय	सचोटीबाबत अभिप्राय	तांत्रिक ज्ञान व क्षमतेबाबत अभिप्राय	५०-५५ वर्षा मधील गोपनीय अहवाल	शेरा पात्र/अपात्र
१	श्री. शिवलिंगप्पा शिवप्पा उमाघोळ (शिपाई)	०१/०६/१९६३	चांगली	चांगली	-	लागू नाही	पात्र
२	श्री. प्रकाश विठ्ठल गोगावले (शिपाई)	३१/०३/१९६४	चांगली	चांगली	-	लागू नाही	पात्र
३	श्रीमती सत्यभामा कैलास धावरे (शिपाई)	०१/०६/१९६२	चांगली	चांगली	-	लागू नाही	पात्र
४	श्री. गजानन गुलाब घाडगे (शिपाई)	२३/०८/१९६३	चांगली	चांगली	-	लागू नाही	पात्र
५	श्रीमती ताराबाई बाळासाहेब म्हेत्रे (शिपाई)	०१/०६/१९६३	चांगली	चांगली	एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण	लागू नाही	पात्र
६	श्री. बाबासाहेब कृष्ण ओव्हाळ (शिपाई)	११/०३/१९६७	चांगली	चांगली	-	लागू नाही	पात्र

वरील बाबी अवलोकन करता सेवकांची सेवा चालू ठेवणेबाबत शिफारस आहे.
तरी वरील वस्तुस्थिती अवलोकन होऊन आपले आदेश होणेस विनंती आहे.
मा.स.कळावे,

21.8.19.

(शाम तारू)
प्रशासन अधिकारी
कर आकारणी व कर संकलन कार्यालय
पुणे महानगरपालिका

21.08.19.

(वैभव कडलख)
महापालिका सहा. आयुक्त
कर आकारणी व कर संकलन कार्यालय
पुणे महानगरपालिका

कर आकारणी व कर संकलन प्रमुख
मान्यता टपाल क्रमांक
एसी/एस. ए. सी./ ५६८२
दिनांक ५/१/१९

21/1/19

(विलास कानडे)
सह महापालिका आयुक्त
तथा